ठाणे, बुधवार दि. २२ मे २०२४ | वर्ष : १३, अंक : २४, पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026


# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे


अग्रलेख

**अंटार्क्टिक संसद बैठकीचे महत्व**

भारताच्या नॅशनल सेंटर फॉर ध्रुवीय आणि महासागर संशोधन, गोवा, पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या सहकार्याने यंदा अंटार्क्टिक संसद बैठक आयोजित केली आहे.

पान २ वर

**'अष्टपदी' हा नवा चित्रपट येणार प्रेक्षकांच्या भेटीला**

...पान ३ वर


ई-पेपरसाठी नियमित पहा...

ePaper PDF

www.maharashtrasamrat.com



**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ४१° से | २८° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७१,०१० | ८१,८६० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



अभिनंदन! सततच्या पक्षबदलामुळे तुम्हाला आता मोठी प्रसिद्धी मिळत आहे, 'पलटूराम' म्हणून!

## उन्हाचा चटका वाढल्याने नागरिक हैराण....



ठाण्यात गेल्या काही दिवसांपासून तापामानातील चढ-उतार सुरूच आहेच. उन्हाचा पारा ३२ अंश सेल्सिअस पार गेल्याने उन्हाचा चटका असह्य झाला आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच काही भागात ढगाळ हवामानामुळे उकाड्यातही चांगलीच वाढ झाली आहे. दिवसभर चटके देणारे ऊन लागत असल्यामुळे नागरिकांनी आपल्या डोक्याला तर महिलांनी संपूर्ण चेहऱ्यावर स्काफ बांधून उन्हापासून बचाव करताना पाहायला मिळत अहे. ( छाया – मनोज सिंह)

बारावीचा निकाल जाहीर

# यंदाही बारावीच्या निकालात मुलींचीच बाजी!

**ठाणे जिल्ह्याचा बारावीचा निकाल 92.08 टक्के**

**विज्ञान शाखेचा सर्वाधिक निकाल**



**ठाणे (वार्ताहर) – उच्च माध्यमिक म्हणजेच बारावीचा निकाल मंगळवारी जाहीर झाला असून ठाणे जिल्ह्यात यंदा ९२. ०८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा निकाल हा कमी लागला असला तरी, यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. जिल्ह्यात ९४.०७ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. तर, यंदा विज्ञान शाखेचा सर्वाधिक म्हणजेच ९७.०५ टक्के निकाल लागला आहे.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे सन २०२३ -२४ चा इयत्ता बारावीचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. यंदा ठाणे जिल्हाचा निकाल ९२.०८ टक्के लागला असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी दिली. यंदाच्या वर्षी ठाणे जिल्ह्यातून बारावीच्या परिक्षेला एकूण ९७ हजार ६६२ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. त्यापैकी ८९ हजार ९३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्यातील उत्तीर्ण झालेल्या ८९ हजार ९३५ विद्यार्थ्यांमध्ये ४५ हजार ६५५ मुले आणि ४४ हजार २८० मुलींचा समावेश आहे. यंदाच्या वर्षी जिल्ह्यात ग्रामीण भागातील मुरबाड तालुक्याचा निकाल सर्वाधिक लागला असून याठिकाणी ९८.०१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचे प्रमाण आहे. मुरबाड तालुक्यातील १ हजार ९६५ विद्यार्थ्यांनी बारावीची परिक्षा दिली होती. (पान २ वर)

### ठाणे जिल्ह्यातील टक्केवारी

| ताजुका | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| कल्याण ग्रामीण | ९५.५२ | ९६.९५ | ९६.०५ |
| अंबरनाथ | ९०.६१ | ९४.३५ | ९२.४९ |
| भिवंडी | ८४.३१ | ९४.०७ | ८९.१८ |
| मुरबाड | ९७.०० | ९८.९९ | ९८.०१ |
| शहापूर | ८९.८९ | ९५.६० | ९२.८० |
| ठाणे एम एन पी एरिया | ९१.१३ | ९३.८२ | ९२.४१ |
| नवी मुंबई एम एन पी | ९३.०३ | ९४.४६ | ९३.७० |
| भाईंदर एम एन पी एरिया | ९१.९८ | ९५.१६ | ९३.४९ |
| कल्याण-डोंबिवली | ८७.८३ | ९२.६१ | ९०.१२ |
| उल्हासनगर एम एन पी | ८८.३० | ९३.३७ | ९०.८० |
| भिवंडी एम एन पी एरिया | ८८.०९ | ९४.९५ | ९१.६० |
| एकूण ठाणे जिल्हा | ९०.२३ | ९४.०७ | ९२.०८ |

## राज्याचा निकाल ९३.३७ टक्के

यंदाचा बारावीचा संपूर्ण राज्याचा ९३.३७ टक्के निकाल लागला आहे. सर्व विभागीय मंडळातून नियमित निकालाची टक्केवारी मुलांपेक्षा ३.८४ टक्क्यांनी जास्त आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाने १५ फेब्रुवारी ते २ एप्रिल दरम्यान ही परीक्षा घेतली होती. बोर्डाने मंगळवारी परीक्षेचा निकाल जाहीर केला.



### छत्रपती संभाजीनगरच्या लेकीला १०० टक्के गुण

राज्यात एकमेव विद्यार्थिनीला १०० टक्के गुण मिळाले आहेत. महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगरमध्ये राहणाऱ्या मुलीला बारावीच्या परीक्षेत १०० टक्के गुण मिळाले आहे. रेणुका बोरमणीकर असं या विद्यार्थीनीचं नाव आहे. देवगिरी महाविद्यालयात ती शिक्षण घेत होती. १०० टक्के गुण मिळवलेली ही राज्यातील एकमेव विद्यार्थिनी आहे. या विद्यार्थिनीला प्रत्यक्ष परीक्षेत ५८२ आणि क्रीडा गुण १८ असे एकूण ६०० पैकी ६०० गुण मिळाले आहेत.

**मुंबई विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर, २२ मे पासून प्रवेश सुरू, २६ जूनला पहिली गुणवत्ता यादी...**पान २ वर

# ठाणे, मुंबईतील मतदान घोळाची होणार चौकशी

## मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिवांना आदेश



**मुंबई : लोकसभा निवडणुकांच्या ५ व्या आणि राज्यातील शेवटच्या मुंबईसह १३ लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडला. आत्तापर्यंतच्या सर्वच टप्प्यांच्या एकूण मतदानाची टक्केवारी पाहिल्यास ५ व्या टप्प्यात सर्वात कमी मतदान झालं आहे. विशेषत: मुंबईतील अनेक मतदारसंघात मोठा घोळ झाल्याचं दिसून आलं. मतदार याद्यांमध्ये नाव नसल्याने मतदारांनी संताप व्यक्त केला आहे. तर, मतदान प्रक्रिया अतिशय संथ गतीन राबवण्यात येत असल्याने मतदान केंद्राबाहेर रांगाच रांगा लागल्याचंही दिसून आलं. त्यामुळे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी संताप व्यक्त करत न्यायालयात जाणार असल्याचे म्हटले आहे. आता, याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले आहेत.**

मुंबईसह विविध मतदारसंघात ५ व्या टप्प्यातील मतदान प्रक्रियेत अनेक मतदान केंद्रांवर मोठा घोळ झाल्याची ओरड झाली होती. मतदानाच्या दिवशी (पान २ वर)

### भिवंडीत कपिल पाटील भडकले

भिवंडी लोकसभा मतदारसंघात बोगस मतदान झाल्याचा आरोप करत गोंधळ पाहायला मिळाला. सकाळपासून शांततेत मतदान होत असताना सायंकाळी चारनंतर केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्याकडे बोगस मतदान होत असल्याची तक्रार आली. त्यानंतर कपिल पाटील हे थेट मतदान केंद्रावर धडकले व त्या ठिकाणी त्यांनी जोरदार राडा केला. एवढेच नव्हे तर मतदान केंद्रावर मतदातांना तसेच अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांना दमदाटी व शिवीगाळ देखील केली. हा प्रकार शहरातील मिलत नगर, खंडू पाडा, बाला कंपाउंड परिसरात असलेल्या मतदान केंद्रावर झाल्याने, कपिल पाटील यांनी येथे भेट दिली होती.

### रवींद्र वायकर व अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक वाद

मुंबईच्या गोरेगाव पूर्वेत आरे कॉलनी परिसरात मतदार केंद्रात निवडणूक अधिकारी आणि शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्यामध्ये बाचाबाची झाल्याची पाहायला मिळाली. ठाकरे गटाचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांचे कार्यकर्ते डमी ईव्हीएम मशीन घेऊन बसले आहेत, या संदर्भात माहिती घेण्यासाठी उमेदवार रवींद्र वायकर मतदार केंद्रात आले असता अधिकारी आणि रवींद्र वायकर यांच्यामध्ये बाचाबाची झाली होती.


### ठाण्यातही बोगस मतदानाचा आरोप

ठाणे लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांनीही बोगस मतदान झाल्याचा आरोप केला आहे. ठाण्यात राजन विचारे विरुद्ध महायुतीचे नरेश म्हस्के यांच्यात थेट लढत आहे. तर, नरेश म्हस्केंच्या माध्यमातून ठाण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

**२४ कल्याण लोकसभा मतदारसंघातील मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर**

**२५ ठाणे लोकसभा मतदारसंघातील मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर**

(सविस्तर वृत्त पान २ वर)



लोकसभा निवडणुकीचे मतदान सोमवारी पार पडले. येथील मतपेट्या ठाण्यातील घोडबंदर रोडवरील आनंदनगर येथील होरायझन शाळेत ठेवण्यात आले आहेत.... (छाया : मनोज सिंह)

ठाण्यात भाजप पदाधिकाऱ्याचे मैत्रीचे होर्डिंग

# झाले इलेक्शन.... जपा रिलेशनचा दिला मैत्रीचा संदेश

ठाणे (वार्ताहर) - लोकशाहीचा उत्सव सोमवारी शांततेत पार पडला. मात्र निवडणुकीच्या अनुषंघाने पक्ष आणि नेत्यांमध्ये वाद झाले आरोप प्रत्यारोपच्या फैरी झडल्या. दुसरीकडे राजकरणाचा स्तर पडत चालला असतानाच निर्माण झालेले वातावरण आणि तनाव हा सोमवारी संध्याकाळी संपला. एक दुसर्यावरच्या आरोपाचे युद्ध संपले त्यामुळे आता पुन्हा मैत्रीपूर्ण वातावरण व्हावे महणून ठाण्यातील भाजप पदाधिकारी महेश कदम यांनी ठाण्यातील विविध पक्षाच्या नेत्यांना एक महत्वपूर्ण संदेश दिला. झाले इलेक्शन.... जपा रिलेशन असा संदेश दिल्याने ते होर्डिंग ठाणेकरांचे आकर्षण ठरले आहे. ठाण्याच्या पाचपाखाडी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते आणि भाजप पदाधिकारी महेश कदम यांनी हे होर्डिंग लावलेले आहे. माणुसकीचा महाराष्ट्र अशी ओळख देशात महाराष्ट्र राज्याची आहे. तर संस्कृतीचे शहर महणून राज्यात ठाण्याची ओळख आहे. मात्र मागील काही वर्षात राजकारणाचा स्तर खालावलेला आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रात भाजपने केलेल्या फोडफोडीमुळे राजकारण अगदीच रसातळाला गेलेला होता. राष्ट्रवाडी आणि शिवसेना फुटल्याने दोन पक्षाचे चार पक्ष झाले.

तीन पक्षाची आघाडी आणि तीन पक्षाची महायुती झाली. त्यामुळे निवडणुकीत वर्षानुवर्ष असलेले मित्र हे वैरी झाले. प्रचाराच्या रणधुमाळीत मित्रांनीच मित्रांवर चिखलफेक करण्याची परिस्थिती उद्भवली. यामुळे माने दुखावली. आरोप मनावर कोरले गेले आणि वितुष्टता निर्माण झाली. सोमवारी संध्याकाळपर्यंत हा प्रकार सुरूच होता. मात्र सोमवारी संध्याकाळी निवडणुकीचे मतदान शांततेत काही आक्षेप नोंदवित जिल्ह्यातील उमेदवाराचे भवितव्य मत पेटीत बंदिस्त झाले आहे. त राजकीय विरोध वितुष्ट हे संपुष्टात यावे महणून महेश कदम यांनी अगदी बोधक आणि वास्तव हे होर्डिंगच्या माध्यमातून स्पष्ट करीत मैत्रीचा सल्ला दिला आहे. झाले इलेक्शन.... जपा रिलेशन या एका वाक्यात खूप काही स्पष्ट केलेले आहे.




# विमानाची फ्लेमिंगो पक्ष्यांच्या थव्याला धडक

**मुंबई – विमानतळावर उतरणाऱ्या एका विमानाची फ्लेमिंगो पक्ष्यांच्या थव्याला धडक बसल्याने ३६ फ्लेमिंगो पक्ष्यांचा मृत्यू झाला आहे. घाटकोपरच्या पंतनगर येथील लक्ष्मीनगर परिसरात सोमवारी रात्रीही घटना घडली आहे. आणखी जखमी फ्लेमिंगोंचा परिसरात शोध घेणे सुरू आहे.मुंबई विमानतळावरील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ईके ५०८ क्रमांकाचे अमिराती कंपनीचे विमान सोमवारी रात्री ९ वाजून १८ मिनिटांनी मुंबई विमानतळावर उतरत असताना ही घटना घडली. विमान लँडिंगसाठी परंतु पक्ष्यांची धडक बसल्याने लँडिंगवर काही परिणाम झाला नाही. विमान सुरक्षितपणे खाली उतरण्यात पायलट यशस्वी झाला.**

विमान उतरताच फ्लेमिंगो पक्ष्यांना धडक बसल्याची माहिती विमानतळ अधिकाऱ्यांना देण्यात आली. सध्या हे विमान ग्राऊंड करण्यात आले असून एअरक्राफ्ट इंजिनियर या विमानाची तपासणी करत आहे.

**36 फ्लेमिंगो पक्ष्यांचा मृत्यू**






खारफुटी संरक्षण कक्षाचे अतिरिक्त मुख्य वनसंरक्षक एस. वाय. रामाराव यांनी दिलेल्या माहितीनुसार, या परिसरात २९ फ्लेमिंगोंचे मृतदेह सापडले आहे. या घटनेत आणखी फ्लेमिंगो मारले गेले आहेत का, याचा शोध सुरू आहे. लक्ष्मीनगरजवळ (घाटकोपर पूर्वेचे उत्तर टोक) येथे हा प्रकार घडला असून विमानतळ प्रशासनाने विमानाची पक्ष्यांना धडक बसल्याच्या घटनेला दुजोरा दिला आहे. खारफुटी संरक्षण कक्षाचे उपसंरक्षक दीपक खाडे यांनी ही माहिती दिली.

'वनशक्ती' या स्वयंसेवी संस्थेचे पर्यावरणवादी डी. स्टॅलिन कढला म्हणाले, 'पक्षी कशामुळे विमानावर धडकले याचा तपास केला जात आहे. अभयारण्य क्षेत्रातून जाणाऱ्या नवीन वीजवाहिन्यांमुळे पक्ष्यांची दिशाभूल होत आहे, असा माझा अंदाज आहे. त्याला कधीच परवानगी द्यायला नको होती. पर्यायी मार्ग अनेक होते. वीजवाहिन्यांना परवानग्या देताना (पूर्वी अभयारण्यात प्रवेश दिला जात नव्हता) वन्यजीव मंडळाने वीज कंपनीसमोर शरणागती पत्करली होती. ठाणे खाडी वन्यजीव अभयारण्य नष्ट करून वीजकंपनीने टॉवर्स उभारले आहे.

खारफुटी संरक्षण कक्षाचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर प्रशांत बहादूरे हिंदुस्थान टाईम्सला म्हणाले, 'मी विमानतळावर गेलो असता अधिकाऱ्यांनी मला प्रवेश दिला नाही. या फ्लेमिंगोंना अमिरातीच्या विमानाने धडक दिल्याचे विमानतळ प्रशासनाने आम्हाला सांगितले आहे. ही घटना रात्री ८.४० ते ८.५० च्या दरम्यान घडली असावी. आम्हाला स्थानिक रहिवाशांकडून फोन आला. त्यानंतर रात्री सव्वा नऊ वाजता आमची टीम घटनास्थळी पोहोचली होती.

नव्याने उभारण्यात येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणाऱ्या विमानांना पक्ष्यांची धडक बसू शकते, असा दावा सिडकोने केला होता. त्यामुळे नवीमुंबईतील एनआरआय कॉम्प्लेक्स परिसरातील पाणथळ जागेतील आणि टीएस चाणक्य तलावातील फ्लेमिंगोच्या कळपांना गेल्या महिन्यापासून त्रास देऊन हुसकावून लावण्यात येत असल्याचं स्टॅलिन म्हणाले.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## अंटार्क्टिक संसद बैठकीचे महत्व

भारताच्या नॅशनल सेंटर फॉर ध्रुवीय आणि महासागर संशोधन, गोवा, पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या सहकार्याने यंदा अंटार्क्टिक संसद बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत अंटार्क्टिक कराराचे ५६ सदस्य देश सहभागी होत आहेत. भारतात सध्या अंटार्क्टिक संसदेची बैठक २० मे रोजी सुरू झाली आहे आणि कोची येथे ३० मेपर्यंत चालणार आहे. भारत यंदा ४६ व्या अंटार्क्टिक करार सल्लागार बैठकीचे आयोजन करीत आहे, ज्याला अंटार्क्टिक संसद म्हणून ओळखले जाते. भारताच्या नॅशनल सेंटर फॉर ध्रुवीय आणि महासागर संशोधन, गोवा, पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या सहकार्याने यंदा अंटार्क्टिक संसद बैठक आयोजित केली आहे. भारताने २००७ मध्ये नवी दिल्ली येथे शेवटचे अंटार्क्टिक संसद बैठकीचे आयोजन केले होते.

अंटार्क्टिक करारावर अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, चिली, फ्रान्स, जपान, न्यूझीलंड, नॉर्वे, दक्षिण आफ्रिका, युनायटेड किंगडम आणि युनायटेड स्टेट्स या १२ देशांनी स्वाक्षरी केली आणि १ डिसेंबर १९५९ रोजी अंटार्क्टिक करार अंमलात आला. १९६१ मध्ये तो लागू करण्यात आला. त्यानंतर आतापर्यंत एकूण ५६ देश यात सहभागी झाले आहेत. त्याच वेळी भारत १९८३ मध्ये त्याचा सदस्य झाला. शीतयुद्धादरम्यान स्वाक्षरी केलेल्या अंटार्क्टिका कराराने अंटार्क्टिकाला आंतरराष्ट्रीय भू राजकीय स्पर्धेच्या मर्यादेबाहेर नो मॅन लँड म्हणून प्रभावीपणे नियुक्त केले. त्यामुळे या करारात अनेक महत्त्वाच्या घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

अंटार्क्टिकाचा वापर केवळ शांततापूर्ण हेतूंसाठी केला जाईल आणि या क्षेत्राचे सैन्यीकरण किंवा तटबंदीला परवानगी दिली जाणार नाही. सर्व स्वाक्षरीकर्त्यांना वैज्ञानिक तपासणी करण्याचे स्वातंत्र्य असेल आणि त्यांनी वैज्ञानिक कार्यक्रमांसाठी योजना सामायिक कराव्यात, आवश्यक सहकार्य करावे आणि गोळा केलेला डेटा मुक्तपणे उपलब्ध करून द्यावा. अंटार्क्टिकामध्ये कुठेही आण्विक चाचणी किंवा किरणोत्सर्गी कचरा सामग्रीची विल्हेवाट लावण्यास मनाई असेल. या भूमीवर नि:शस्त्रीकरण राबवण्यात आले आहे. हा करार पृथ्वीवरील पाचव्या क्रमांकाचा सर्वात मोठा खंड असलेल्या अंटार्क्टिकामधील सर्व शासन आणि हालचालींचा आधार झाला आहे. ज्याचा उद्देश अंटार्क्टिकाचे संरक्षण करणे आणि वैज्ञानिक संशोधन करणे हे आहे

अंटार्क्टिक करारात भारत १९८३ पासून अंटार्क्टिक कराराचा सल्लागार पक्ष आहे. या क्षमतेनुसार भारत अंटार्क्टिकासंबंधी सर्व प्रमुख निर्णय प्रक्रियेत मतदान करतो आणि सहभागी होतो. अंटार्क्टिक करारात सामील असलेल्या ५६ देशांपैकी २९ देशांना सल्लागार गटाचा दर्जा आहे. भारताने अंटार्क्टिकामध्ये १९८१ मध्ये वैज्ञानिक संशोधन सुरू केले, जे अजूनही सुरू आहे. दक्षिण गंगोत्री नावाचे पहिले भारतीय अंटार्क्टिका संशोधन केंद्र १९८३ मध्ये दक्षिण ध्रुवापासून सुमारे २५०० किमी अंतरावर क्वीन मॉड लँडमध्ये स्थापित केले गेले. हे स्टेशन १९९० पर्यंत कार्यरत होते. १९८९ मध्ये भारताने आपले मैत्री नावाचे दुसरे अंटार्क्टिक संशोधन केंद्र शिर्माचेर ओएसिसमध्ये स्थापित केले, १०० हून अधिक गोड्या पाण्याच्या तलावांसह ३ किमी रुंद बर्फमुक्त पठारावर ते तयार करण्यात आले. हे संशोधन केंद्र अजूनही कार्यरत आहे आणि रशियाच्या नोव्होलझारेव्हस्काया स्टेशनपासून सुमारे ५ किमी आणि दक्षिण गंगोत्रीपासून ९० किमी अंतरावर आहे. नॅशनल सेंटर फॉर ध्रुवीय आणि महासागर संशोधनानुसार, मैत्रीमध्ये उन्हाळ्यात ६५ आणि हिवाळ्यात २५ लोक सामावून घेऊ शकतात. २०१२ मध्ये भारताने मैत्रीच्या पूर्वेला सुमारे ३ हजार किमी अंतरावर प्राइड्झ बे किनाऱ्यावर असलेल्या भारती या तिसऱ्या अंटार्क्टिका संशोधन केंद्राचे उद्घाटन केले. स्टेशन समुद्रशास्त्रीय आणि भूगर्भशास्त्रीय अभ्यासांवर लक्ष केंद्रित करते आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो )त्याचा वापर भारतीय रिमोट सेन्सिंग सॅटेलाइट डेटा प्राप्त करण्यासाठी करते. हे स्टेशन उन्हाळ्यात ७२ आणि हिवाळ्यात ४७ लोकांना ठेवण्यास सक्षम आहे. तसेच भारत आपल्या जुन्या मैत्री स्थानकापासून काही किलोमीटर अंतरावर एक नवीन स्टेशन मैत्री उघडण्याची योजना आखत आहे आणि त्याचे कार्य २०२९ पर्यंत सुरू होणे अपेक्षित आहे. २०२२ मध्ये भारताने अंटार्क्टिक कायदा लागू केला, अंटार्क्टिक करारासाठी आपल्या वचनबद्धतेचीही खातरजमा केली.

अंटार्क्टिक संसद बैठकीचा उद्देश अंटार्क्टिकामधील कायदा आणि सुव्यवस्था, लॉजिस्टिक, प्रशासन, विज्ञान, पर्यटन आणि दक्षिण खंडातील इतर पैलूंवर जागतिक संवाद सुलभ करणे हा आहे. या परिषदेदरम्यान भारत अंटार्क्टिकामध्ये शांततापूर्ण प्रशासनाच्या कल्पनेला चालना देण्याचा प्रयत्न करेल आणि जगातील इतरत्र भू राजकीय तणावामुळे खंड आणि तेथील संसाधनांच्या सुरक्षेत अडथळा येऊ नये, यावर भर दिला जाईल. महाद्वीपातील पर्यटनाचे नियमन करण्यासाठी भारत एक नवीन कार्यगट देखील सादर करेल, असे जल विद्युत व पुनरऊर्जा सचिव डॉ. एम. रविचंद्रन यांनी म्हटले आहे. अंटार्क्टिकामधील पर्यटनासाठी नियम तयार करण्याबाबत भारताला पाठिंबा देणारे नेदरलँड, नॉर्वे आणि इतर काही युरोपीय देश या कार्यगटाचा भाग आहेत. त्यामुळे पर्यटनाबाबत एकमत होईल, अशी आशा आहे. कोची बैठकीदरम्यान भारत मैत्री २ च्या बांधकामाची योजना अधिकृतपणे सदस्यांसमोर सादर करेल. अंटार्क्टिकामधील कोणतेही नवीन बांधकाम किंवा उपक्रमासाठी अंटार्क्टिकची मंजुरी आवश्यक आहे. अंटार्क्टिक संसदेत अनेक घडामोडी होणार आहेत, ज्या भारताला काही क्षेत्रांत महत्वाच्या ठरणार आहेत.

जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'

☆ मिळकट नोटीस ☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस ☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा ☆ कामगार न्यायालय नोटीस

- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

# २४ कल्याण लोकसभा मतदारसंघातील मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर

## २४ कल्याण लोकसभा मतदारसंघात एकूण ५०.१२ टक्के मतदान

ठाणे – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदान दि. २० मे २०२४ रोजी पार पडले. २४ कल्याण लोकसभा मतदारसंघात एकूण ५०.१२ टक्के मतदान झाली असल्याची माहिती २४ कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी दिली. २४ कल्याण लोकसभा मतदारसंघात एकूण ५०.१२ टक्के मतदान झाले असून पुरुष मतदारांचे प्रमाण ५२.१९ टक्के, महिला मतदारांचे प्रमाण ४७.७५ टक्के तर इतर मतदारांचे प्रमाण २१.६३ टक्के इतके आहे.

**ठाणे जिल्ह्यातील २४ कल्याण मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे :–**

■ **१४० अंबरनाथ –** एकूण मतदारांची संख्या : ३ लाख ५३ हजार ५५४, मतदान केलेले मतदार : १ लाख ६६ हजार ४०७, (एकूण टक्केवारी – ४७.०७ %.) पुरुष मतदार संख्या : १ लाख ८९ हजार ८४४, मतदान केलेले पुरुष मतदार : ८२ हजार २४८, महिला मतदार : १ लाख ६३ हजार ६५४, मतदान केलेल्या महिला मतदार : ७४ हजार १४०, इतर मतदार : ५६, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : २१.

■ **१४१ उल्हासनगर –** एकूण मतदारांची संख्या : २ लाख ५७ हजार ३६७. मतदान केलेले मतदार : १ लाख ३१ हजार ५०५, (एकूण टक्केवारी – ५१.१० %.) पुरुष मतदार संख्या : १ लाख ३९ हजार ८४८, मतदान केलेले पुरुष मतदार : ७४ हजार ८७७, महिला मतदार संख्या : १ लाख १७ हजार ४२२, मतदान केलेले महिला मतदार : ५६ हजार ६०६, इतर मतदार संख्या : ९७, मतदान केलेले इतर मतदार : २२.

■ **१४२ कल्याण पूर्व –** एकूण मतदारांची संख्या : २ लाख ९९ हजार ३८०, मतदान केलेले मतदार : १ लाख ५६ हजार २३५ (एकूण मतदानाची टक्केवारी – ५२.१९ %). पुरुष मतदारांची एकूण संख्या : १ लाख ५९ हजार २८९, मतदान केलेल्या पुरुष मतदारांची संख्या : ८७ हजार ७८४, महिला मतदारांची एकूण संख्या : १ लाख ३९ हजार ६८४, मतदान केलेल्या महिला मतदारांची संख्या : ६८ हजार ३७०, इतर मतदारांची एकूण संख्या : ४०७. मतदान केलेल्या इतर मतदारांची संख्या : ८१.

■ **१४३ डोंबिवली –** एकूण मतदारांची संख्या : २ लाख ७५ हजार ११०, मतदान केलेले मतदार : १ लाख ४२ हजार १४२ (मतदानाची टक्केवारी – ५१.६७ %). पुरुष मतदारांची एकूण संख्या : १ लाख ४३ हजार १९६, मतदान केलेले पुरुष मतदार : ७८ हजार ०२३, महिला मतदारांची एकूण संख्या : १ लाख २१ हजार ९१४, मतदान केलेल्या महिला मतदार : ६४ हजार ११९, इतर मतदारांची संख्या : ०, मतदान केलेल्या इतर मतदारांची संख्या : ०).

■ **१४४ कल्याण ग्रामीण –** एकूण मतदारांची संख्या : ४ लाख ५३ हजार १४९, मतदान केलेल्या एकूण मतदारांची संख्या : २ लाख ३१ हजार १६२ (एकूण मतदानाची टक्केवारी – ५१.०१ %). पुरुष मतदारांची एकूण संख्या : २ लाख ४८ हजार १२४, मतदान केलेले पुरुष मतदार : १ लाख ३२ हजार २१६, महिला मतदारांची एकूण संख्या : २ लाख ०४ हजार ९०२, मतदान केलेल्या महिला मतदार : ९८ हजार ९१०, इतर मतदार : १२३, मतदान केलेल्या इतर मतदारांची संख्या : ३६.

■ **१४९ मुंब्रा कळवा –** एकूण मतदारांची संख्या : ४ लाख ४३ हजार ६६१, मतदान केलेल्या एकूण मतदारांची संख्या : २ लाख १६ हजार १५९ (एकूण मतदानाची टक्केवारी – ४८.७२ %). पुरुष मतदारांची एकूण संख्या : २ लाख ३७ हजार ११३, मतदान केलेल्या पुरुष मतदारांची संख्या : १ लाख १८ हजार ०१३, महिला मतदारांची एकूण संख्या : २ लाख ०६ हजार ४४५, मतदान केलेल्या महिला मतदारांची संख्या : ९८ हजार १३६, इतर मतदारांची एकूण संख्या : १०३, मतदान केलेल्या इतर मतदारांची संख्या : १०)

# २५ ठाणे लोकसभा मतदारसंघातील मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर

## २५ ठाणे लोकसभा मतदारसंघात एकूण ५२.०९ टक्के मतदान

ठाणे – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदान दि. २० मे २०२४ रोजी पार पडले. २५ लोकसभा मतदारसंघात एकूण ५२.०९ टक्के मतदान झाली असल्याची माहिती २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये– धुळे यांनी दिली. २५ ठाणे लोकसभा मतदारसंघात एकूण ५२.०९ टक्के मतदान झाले असून पुरुष मतदारांचे प्रमाण ५३.२२ टक्के, महिला मतदारांचे प्रमाण ५०.७९ टक्के तर इतर मतदारांचे प्रमाण १७.३९ टक्के इतके आहे.

**ठाणे जिल्ह्यातील २५ ठाणे मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे :–**

■ **१४५ मिरा भाईंदर :** एकूण मतदारांची संख्या : ०४ लाख५७ हजार ३५९ पैकी ०२ लाख २३ हजार ८९८ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ४८.९५ %.) पुरुष मतदार संख्या : ०२ लाख ४२ हजार ९६६, मतदान केलेले पुरुष मतदार : ०१ लाख २१ हजार ५३५, महिला मतदार : ०२ लाख १४ हजार ३८९, मतदान केलेल्या महिला मतदार : ०१ लाख ०२ हजार ३६३, इतर मतदार :०४ मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ०.

■ **१४६ ओवळा माजिवडा :** एकूण मतदारांची संख्या : ०५ लाख ०९ हजार २२७, पैकी ०२ लाख ५८ हजार २५५ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ५०.७२ %.) पुरुष मतदार संख्या : ०२ लाख ७३ हजार २७२, मतदान केलेले पुरुष मतदार : ०१ लाख ४२ हजार ४६४, महिला मतदार : ०२ लाख ३५ हजार ९२८ मतदान केलेल्या महिला मतदार : ०१ लाख १५ हजार ७८८ , इतर मतदार : २७, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ०३.

■ **१४७ कोपरी पाचपाखाडी :** एकूण मतदारांची संख्या : ०३ लाख २८ हजार ०५४, पैकी ०१ लाख ८४ हजार ५२२ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ५६.२५ %.) पुरुष मतदार संख्या : ०१ लाख ७५ हजार ५६१, मतदान केलेले पुरुष मतदार :०१ लाख ०१ हजार ४८८, महिला मतदार : ०१ लाख ५२ हजार ४७२, मतदान केलेल्या महिला मतदार : ८३ हजार ०२६, इतर मतदार : २१, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ०८.

■ **१४८ ठाणे :** एकूण मतदारांची संख्या : ०३ लाख ५७ हजार ५४५ पैकी ०२ लाख १२ हजार ८०१ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ५९.५२ %.) पुरुष मतदार संख्या : ०१ लाख ८५ हजार ८५७, मतदान केलेले पुरुष मतदार : ०१ लाख १३ हजार ०९५, महिला मतदार : ०१ लाख ७१ हजार ६८१, मतदान केलेल्या महिला मतदार : ९९ हजार ७०४, इतर मतदार : ०७, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ०२.

■ **१५० ऐरोली :** एकूण मतदारांची संख्या : ०४ लाख ५७ हजार ४५६, पैकी ०२ लाख २१ हजार ७४९ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ४८.४७ %.) पुरुष मतदार संख्या : ०२ लाख ५७ हजार ६११, मतदान केलेले पुरुष मतदार : ०१ लाख २७ हजार ०६८, महिला मतदार : ०१ लाख ९९ हजार ७१५, मतदान केलेल्या महिला मतदार : ९४ हजार ६६१, इतर मतदार : १३०, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : २०.

■ **१५१ बेलापूर :** एकूण मतदारांची संख्या : ०३ लाख ९७ हजार ७३१, पैकी ०२ लाख ०४ हजार ९६९ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ५१.५३ %.) पुरुष मतदार संख्या : ०२ लाख १२ हजार ८९६, मतदान केलेले पुरुष मतदार : ०१ लाख ११ हजार ८६०, महिला मतदार : ०१ लाख ८४ हजार ८१७, मतदान केलेल्या महिला मतदार : ९३ हजार १०६ , इतर मतदार : १८, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ०३.

## यंदाही बारावीच्या निकालात मुलींचीच बाजी

(पान १ वरून) यापैकी १ हजार ९२६ विद्यार्थी हे उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ९३९ मुलांचा तर, ९८७ मुलींचा समावेश आहे.

विज्ञान शाखेचा सर्वाधिक निकाल यंदा जिल्ह्यात विज्ञान शाखेचा सर्वाधिक म्हणजेच ९७.०५ टक्के निकाल लागला आहे. या शाखेतून ३९ हजार ३१ विद्यार्थ्यांपैकी ३७ हजार ८८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा निकाल ९१.३४ टक्के लागला असून या शाखेतून ४५ हजार ११९ विद्यार्थ्यांपैकी ४१ हजार २१६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर, कला शाखेचा निकाल ७९.३९ टक्के लागला आहे. या शाखेतून १२ हजार ६६३ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. त्यापैकी १० हजार ५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचा निकाल ९३.६६ टक्के लागला आहे. या अभ्यासक्रमाची परिक्षा ५६८ विद्यार्थ्यांनी दिली होती. त्यापैकी ५३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यासह, तंत्रज्ञान विज्ञान शाखेचा अभ्यासक्रमाचा निकाल ८९.६७ टक्के लागला असून या अभ्यासक्रमाच्या परिक्षेला २८१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## ठाणे, मुंबईतील मतदान घोळाची चौकशी होणार

(पान १ वरून) झालेल्या या ढिसाळ कारभाराची सरकारनं गंभीर दखल घेतली असून मुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. २० मे रोजी झालेल्या १३ लोकसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांवर ज्या ज्या ठिकाणी गैरसोय होती, मतदानाला विलंब लागत होता, ज्या लोकांना रुग्णालयात दाखल केलं गेलं आहे. या सर्व बाबींची आता होणार चौकशी करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याचे मुख्य सचिव नितीन करी यांना तसे आदेश दिले आहेत. तसेच, मुख्य सचिवांनी तातडीनं याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करावी, असेही आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यामुळे, आता मुंबईतील मतदार याद्यांचा घोळ आणि गोंधळाच्या चौकशीसाठी विशेष समिती नेमूण तपास केला जाऊ शकतो.

मुंबईतील ६ मतदारसंघात २० मे रोजी मतदान पार पडले. तर, भिवंडी, ठाणे, कल्याण लोकसभा मतदारसंघातही मतदान झाले. मात्र, मुंबईसह काही मतदारसंघात संथ गतीने मतदान झाल्याचा आरोप उद्धव ठाकरेंनी केला आहे. त्यानंतर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ठाकरेंच्या आरोपाला प्रत्युत्तर देताना पराभव समोर दिसत असल्यानेच ते आरोप करत आहेत, असे म्हटले होते. मात्र, आता मुख्यमंत्री शिंदेंनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

# २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघातील मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर

## २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघात एकूण ५९.८९ टक्के मतदान

ठाणे, दि. २१ (जिमाका) : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदान दि. २० मे २०२४ रोजी पार पडले. २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघात एकूण ५९.८९ टक्के मतदान झाली असल्याची माहिती २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी दिली.

२३ भिवंडी लोकसभा मतदारसंघात एकूण ५९.८९ टक्के मतदान झाले असून पुरुष मतदारांचे प्रमाण ६०.८६ टक्के, महिला मतदारांचे प्रमाण ५८.७७ टक्के तर इतर मतदारांचे प्रमाण १५.९३ टक्के इतके आहे.

**ठाणे जिल्ह्यातील २३ भिवंडी मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे :–**

■ **१३४ भिवंडी ग्रामीण :** एकूण मतदारांची संख्या : ०३ लाख २३ हजार ९७८ पैकी ०२ लाख ३५ हजार ४११ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ७२.६६ %.) पुरुष मतदार संख्या : ०१ लाख ६८ हजार ३२९, मतदान केलेले पुरुष मतदार : ०१ लाख २५ हजार ९५१, महिला मतदार : ०१ लाख ५५ हजार ६३८, मतदान केलेल्या महिला मतदार : ०१ लाख ०९ हजार ४५९, इतर मतदार : ११, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ०१.




■ **१३५ शहापूर : एकूण मतदारांची संख्या :** ०२ लाख ७९ हजार १३७, पैकी ०१ लाख ९६ हजार ११९ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ७०.२६ %.) पुरुष मतदार संख्या : ०१ लाख ४३ हजार ४०२, मतदान केलेले पुरुष मतदार : ०१ लाख ०५ हजार ४९४, महिला मतदार : ०१ लाख ३५ हजार ७३५, मतदान केलेल्या महिला मतदार : ९० हजार ६२५, इतर मतदार : ०, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ०.

■ **१३६ भिवंडी पश्चिम :** एकूण मतदारांची संख्या : ०३ लाख ०४ हजार ९५९, पैकी ०१ लाख ६८ हजार २४५ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ५५.१७ %.) पुरुष मतदार संख्या : ०१ लाख ७६ हजार ४९९, मतदान केलेले पुरुष मतदार : ९५ हजार ३६१, महिला मतदार : ०१ लाख २८ हजार ३३८, मतदान केलेल्या महिला मतदार : ७२ हजार ८६५ , इतर मतदार : १२२, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : १९.

■ **१३७ भिवंडी पूर्व :** एकूण मतदारांची संख्या : ०३ लाख ३६ हजार ११०, पैकी ०१ लाख ६७ हजार ६१५ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ४९.८७ %.) पुरुष मतदार संख्या : ०१ लाख ९८ हजार ०४४, मतदान केलेले पुरुष मतदार : ९५ हजार २३६, महिला मतदार : ०१ लाख ३७ हजार ८८७, मतदान केलेल्या महिला मतदार : ७२ हजार ३४८, इतर मतदार : १७९, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ३१.

■ **१३८ कल्याण पश्चिम :** एकूण मतदारांची संख्या : ०४ लाख १३८, पैकी ०२ लाख ११ हजार ९८३ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ५२.९८ %.) पुरुष मतदार संख्या : ०२ लाख १२ हजार ६१२, मतदान केलेले पुरुष मतदार : ०१ लाख १७ हजार ७५२, महिला मतदार : ०१ लाख ८७ हजार ५१४, मतदान केलेल्या महिला मतदार : ९४ हजार २२९, इतर मतदार : १२, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ०२.

■ **१३९ मुरबाड :** एकूण मतदारांची संख्या : ०४ लाख ४२ हजार ९२२, पैकी ०२ लाख ७० हजार ७०३ मतदारांनी मतदान केले. (एकूण टक्केवारी ६१.१२ %.) पुरुष मतदार संख्या : ०२ लाख ३० हजार ८२८, मतदान केलेले पुरुष मतदार : ०१ लाख ४७ हजार ७०३, महिला मतदार : ०२ लाख १२ हजार ०७९, मतदान केलेल्या महिला मतदार : ०१ लाख २२ हजार ९९९, इतर मतदार : १५, मतदान केलेले इतर मतदारांची संख्या : ०१.

# मुंबई विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर, २२ मे पासून प्रवेश सुरू, २६ जूनला पहिली गुणवत्ता यादी

मुंबई: मुंबई विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, सर्व संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचे वेळापत्रक विद्यापीठामार्फत जाहीर करण्यात आले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने एकेडमिक बँक ऑफ क्रेडिट आणि अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टिकोनातून विद्यापीठामार्फत पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत चारही विद्याशाखेतील विविध विषयांचा समावेश करण्यात आला आहे. ही सर्व ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि पारदर्शक आहे. https://muadmission.samarth.edu.in/ या संकेतस्थवळावर जाऊन विद्यार्थ्यांना अर्ज करता येईल. प्रवेश नोंदणी ते अर्ज सादर करण्याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी संकेतस्थळावर व्हिडीओ लिंक देण्यात आली आहे.

वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे नियमित वर्ग १ जुलै २०२४ पासून सुरु करण्यात येणार असून सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांनी या वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया राबवावी असे विद्यापीठाने परिपत्रकात नमूद केले आहे.

### प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

- ऑनलाईन नाव नोंदणी आणि प्रवेशअर्ज सादर करणे– २२ मे ते १५ जून २०२४
- विभागांमार्फत कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी – २० जून २०२४ ( संध्याकाळी ६ वाजेपर्यंत)
- तात्पुरती गुणवत्ता यादी– २१ जून २०२४ (संध्याकाळी ६ वाजता)
- विद्यार्थी तक्रार – २५ जून २०२४ (दुपारी १ वाजेपर्यंत)
- पहिली गुणवत्ता यादी – २६ जून २०२४ (संध्याकाळी ६ वाजता)
- ऑनलाईन शुल्क भरणे – २७ जून ते ०१ जुलै २०२४ (संध्याकाळी ५ वाजेपर्यंत)
- द्वितीय गुणवत्ता यादी– ०२ जुलै २०२४ (संध्याकाळी ६ वाजता)
- ऑनलाईन शुल्क भरणे – ०३ जुलै ते ५ जुलै २०२४ (संध्याकाळी ५ वाजेपर्यंत)
- कमेंसमेंट ऑफ लेक्चर्स – ०१ जुलै २०२४

### पदवीच्या प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया २५ मे २०२४ पासून

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी पदवीच्या ३ आणि ४ वर्षीय अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई विद्यापीठाची प्रवेशपूर्व ऑनलाईन नाव नोंदणीची प्रक्रिया २५ मे २०२४ पासून सुरू करण्यात येणार आहे.

या प्रवेशपूर्व ऑनलाईन नाव नोंदणी प्रक्रियेचे वेळापत्रक विद्यापीठामार्फत लवकरच जाहीर केले जाणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार ३ वर्षीय पदवी अभ्यासक्रम, ४ वर्षीय ऑनर्स/ ऑनर्स विथ रिसर्च, इंटिग्रेटेड प्रोग्राम्स विथ मल्टीपल एन्ट्री अँड मल्टीपल एक्जिट या अनुषंगाने ही प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे.



## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- पदाचे नाव : विद्युत सहाय्यक

शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.

- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## इंडियन आर्मी डेंटल कॉर्प्स भरती

- पदाचे नाव: शार्ट सर्विस कमिशन ऑफिसर
- शैक्षणिक पात्रता: (i) ५५% गुणांसह BDS/MDS (ii) एक वर्षाची रोटेटरी इंटर्नशिप पूर्ण (iii) NEET (MDS)-२०२४
- वयाची अट: ३१ डिसेंबर २०२४ रोजी ४५ वर्षांपर्यंत.
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

## भारतीय हवाई दलात अग्निवीरवायु (संगीतकार) पदाची भरती

- कोर्सचे नाव: अग्निवीरवायु इनटेक ०१/२०२५

जागा : पद संख्या तूर्तास निर्दिष्ट नाही.

पदाचे नाव: अग्निवीरवायु (संगीतकार)

- शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) संगीत अनुभव प्रमाणपत्र/डिप्लोमा
- शारीरिक पात्रता: उंची/छाती पुरुष महिला , उंची १६२ सेमी १५२ से.मी.

छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून. –

वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००४ ते ०२ जुलै २००७ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२
- मेळाव्याचा कालावधी: ०३ ते १२ जुलै २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://indianairforce.nic.in/

## यूपीएससीमार्फत संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा २०२४

- परीक्षेचे नाव: संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (CDS-II) २०२४
- पदाचे नाव/कोर्सचे नाव

१ भारतीय भूदल (मिलिटरी) अकॅडेमी, डेहराडून १५९

२ भारतीय नेव्हल अकॅडेमी, एझीमाला, Executive (General Service)/Hydro

३ हवाई दल अकॅडेमी, हैदराबाद,No. 218 F(P) Course

४ ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडेमी (पुरुष) चेन्नई, 122nd SSC (Men) Course (NT)

५ ऑफिसर्स ट्रेनिंग कॅडमी (महिला) चेन्नई,-36th SSC Women (Non-Technical) Course

- जागा : ४५९
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: पदवीधर.
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: पदवी (Physics and Mathematics at 10+2 level) किंवा इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.४: पदवीधर.
पद क्र.५: पदवीधर.

- वयाची अट:

पद क्र.१: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.२: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.३: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००५ दरम्यान.
पद क्र.४: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.५: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ जून २०२४
- लेखी परीक्षा: ०१ सप्टेंबर २०२४
- अधिकृत वेबसाईट:

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/ GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET

पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव

वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- पदाचे नाव : विद्युत सहाय्यक

शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.

- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

# महिनाभर डाळीचे सेवन न केल्यास आरोग्यावर कोणते परिणाम होऊ शकतात?

डाळ ही अत्यंत पौष्टिक असून, याचे आरोग्यास अनेक फायदे आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त डाळीचा आहारात समावेश करणे गरजेचे आहे. डाळीचे अनेक प्रकार आहेत; पण विशेष म्हणजे तूरडाळ शाकाहारी लोकांसाठी एक उत्तम पर्याय आहे; पण जर हीच डाळ एक महिन्यासाठी आहारातून काढून टाकली, तर काय होईल? द इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांच्या हवाल्याने याविषयी सविस्तर माहिती सांगितली आहे.

हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल्सचे वरिष्ठ सल्लागार फिजिशियन व मधुमेह तज्ज्ञ डॉ. के सोमनाथ गुप्ता सांगतात, ''आपल्या चांगल्या निरोगी आरोग्यासाठी प्रोटीन्सची अत्यंत आवश्यकता असते; पण आहारात एक महिना डाळ नसेल, तर प्रोटीन्स मिळवण्यासाठी आपल्याला संघर्ष करावा लागू शकतो. विशेषत: शाकाहारी लोकांसाठी हे खूप मोठे आव्हान ठरू शकते.''

### डाळ खाण्याचे फायदे जाणून घ्या

प्रोटीनयुक्त वनस्पतींवर आधारित पदार्थ : स्नायू मजबूत ठेवण्यासाठी डाळ ही अत्यंत महत्त्वाची असून, शाकाहारी लोकांसाठी ती अत्यंत फायदेशीर आहे.

**आतड्याच्या आरोग्यासाठी फायबर गरजेचे :** डाळीमध्ये खूप जास्त प्रमाणात फायबर असते, जे पचनास मदत करते. त्याशिवाय यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास दूर होतो आणि आतड्यांचे आरोग्य सुदृढ राहते.

**जीवनसत्त्वे आणि खनिजे :** डाळींमध्ये लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम व जीवनसत्त्वे असतात; जी डाळीला अधिक पौष्टिक बनविण्यास मदत करतात.

**रक्तातील साखरेचे नियंत्रण :** डाळीमध्ये असलेले कॉम्प्लेक्स कर्बोदके पचायला वेळ घेतात. त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही.

**हृदयाचे आरोग्य :** नियमित डाळीचे सेवन केल्याने शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते; ज्यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

**वजन नियंत्रण :** डाळीमध्ये प्रोटन्स आणि फायबर भरपूर प्रमाणात राहतात; ज्यामुळे वजन कमी करण्यास आणि नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

**हाडे मजबूत होतात** : डाळीमध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस असतात; जे हाडे मजबूत ठेवण्यास मदत करतात.

महिनाभर डाळीचे सेवन न केल्यास आरोग्यावर कोणते विपरीत परिणाम होऊ शकतात? डॉ. गुप्ता यांनी याविषयी माहिती सांगितली आहे.

प्रोटीन्सची कमतरता : जे लोक शाकाहारी आहेत, त्यांना प्रोटीन्ससाठी डाळींवर सर्वांत जास्त अवलंबून राहावे लागते. डाळीच्या अभावामुळे स्नायू कमकुवत होणे किंवा त्यांना अशक्तपणा जाणवू शकतो.

**पचनाशी संबंधित समस्या :** फायबरचे सेवन कमी केल्याने बद्धकोष्ठतेचा त्रास आणि पचनाशी संबंधित समस्या उदभवू शकतात.

**पौष्टिक घटकांची कमतरता :** डाळीमध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. डाळीचे महिनाभर सेवन केले नाही, तर त्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर आणि प्रतिकारशक्तीवर होऊ शकतो.

डॉ. गुप्ता सांगतात, ''डाळीचे सेवन न केल्याने त्याचा परिणाम थेट तुमच्या आहार, जीवनशैली व आरोग्यावर होऊ शकतो. शाकाहारी लोक टोफू, सुका मेवा, बिया व शेंगा यांसारखे प्रोटीनयुक्त पदार्थ पर्याय म्हणून खाऊ शकतात.'' ते पुढे सांगतात, ''आहारात कोणतेही बदल करताना त्याबाबत जवळच्या डॉक्टरांशी चर्चा करणे गरजेचे आहे.''

डॉ. गुप्ता यांनी दररोज १/२ ते ३/४ कप शिजविलेल्या डाळीचे आहारात सेवन करण्याचा सल्ला दिला आहे.

डाळ ही आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. जर तुम्ही एक महिन्यासाठी डाळीचे सेवन कमी करण्याचा निर्णय घेत असाल, तर त्याऐवजी प्रोटीन्स आणि फायबर स्रोतांचा आहारात समावेश करण्याचा विचार करा. संतुलित आहार आपल्या आरोग्यासाठी खूप गरजेचा आहे.



# एलिमिनेटर सामन्यात विराटला इतिहास रचण्यासाठी सज्ज

**आयपीएलच्या १७व्या हंगामातही विराट कोहली जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे. आता विराट कोहलीला राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या एलिमिनेटर सामन्यात मोठी कामगिरी करण्याच संधी आहे. या सामन्यात विराट अवघ्या २९ धावा करताचा ऐतिहासिक कामगिरी केली आहे.**

आयपीएल २०२४ मध्ये, २२ मे रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात एलिमिनेटर सामना खेळवला जाणार आहे, या हंगामात आरसीबीची सुरुवात खूपच खराब झाली होती. पहिल्या ८ सामन्यात संघाला फक्त एकच सामना जिंकता आला होता, पण यानंतर त्यांनी दमदार पुनरागमन केले आहे. आरसीबीला प्लेऑफ्समध्ये पोहोचवण्यात विराट कोहलीचे योगदा खूप महत्त्वाचे आहे. त्याने प्रत्येक सामन्यात संघासाठी धावांचा पाऊस पाडला आहे. त्यामुळे विराट हा आयपीएल २०२४ मध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे आणि त्याच्या डोक्यावर ऑरेंज कॅप आहे. आता एलिमिनेटर सामन्यात कोहली इतिहास रचण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे.

आयपीएलच्या सुरुवातीपासून विराट कोहली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळत आहे. कोहलीने अनेक वर्षे संघाचे नेतृत्वही केले आहे. आयपीएलच्या इतिहासात कोहलीने आतापर्यंत २५१ सामन्यांच्या २४३ डावांमध्ये ७९७१ धावा केल्या आहेत. सध्या कोहली आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. कोहली आता त्याच्या आठ हजार आयपीएल धावा पूर्ण करण्यापासून २९ धावा दूर आहे. एलिमिनेटर सामन्यात कोहलीने राजस्थान रॉयल्सविरुद्ध २९ धावा केल्या, तर तो आयपीएलमध्ये ८ हजार धावा करणारा पहिला फलंदाज ठरेल.आतापर्यंत कोणत्याही फलंदाजाला आयपीएलमध्ये ही कामगिरी करता आलेली नाही.

विराटला स्वत:चा विक्रम मोडण्याची संधी

विराट कोहलीने आयपीएलमध्ये ८ शतके आणि ५० अर्धशतके झळकावली आहेत. याशिवाय नाबाद ११३ धावा ही त्याची सर्वोत्तम धावसंख्या आहे.आयपीएलच्या इतिहासात कोहलीने ७०२ चौकार आणि २७१ षटकार मारले आहेत. त्याचबरोबर विराट आता एका मोसमात सर्वाधिक धावांचा म्हणजेच ९७३ धावा करण्याचा स्वत:चा विक्रम मोडण्यापासून २६६ धावा दूर आहे. भारतीय फलंदाजाने हा विक्रम २०१६ मध्ये आपल्या नावावर केला होता. त्या हंगामात विराटने ४ शतके आणि ७ अर्धशतके झळकावली होती. विशेष म्हणजे आरसीबीने त्या वर्षी अंतिम फेरी गाठली होती, पण अंतिम फेरीत सनरायझर्स हैदराबादकडून पराभव पत्करावा लागला होता.

### विराट कोहलीची आयपीएल २०२४ मधील कामगिरी

आयपीएल २०२४ मध्ये विराट कोहलीची बॅट धावांच्या बाबतीत आग ओकत आहे. यंदाच्या हंगामात विराट कोहलीने शतक झळकावले आहे. आतापर्यंत १४ सामन्यांत कोहलीने १५५ च्या स्ट्राईक रेटने ७०८ धावा केल्या आहेत. या कालावधीत कोहलीने ५९ चौकार आणि ३७ षटकार मारले आहेत. आता एलिमिनेटर सामन्यात कोहलीकडून संघाला अशाच शानदार कामगिरीची अपेक्षा असेल.

### कोहलीला इतिहास रचण्याची संधी



# ‘अष्टपदी’ हा नवा चित्रपट येणार प्रेक्षकांच्या भेटीला

साडे तीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा असलेल्या अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त साधत ‘अष्टपदी’ या नव्या कोऱ्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. मराठीत नेहमीच वेगवेगळ्या विषयांवर आधारलेल्या चित्रपटांची निर्मिती केली जात आहे. ‘अष्टपदी’ हा चित्रपटही त्याच पठडीतील ठरणार आहे. भारतीय विवाह संस्कृतीमध्ये सप्तपदीला खूप महत्त्व आहे, पण या चित्रपटाचं शीर्षक ‘अष्टपदी’ असल्याने यात नेमकं काय पाहायला मिळणार याबाबत कुतूहल जागं होतं. ‘अष्टपदी’च्या रूपात एक संगीतमय त्रिकोणी प्रेमकथा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

महश्री प्रॉडक्शन आणि युवराज सिने क्रिएशनच्या बॅनरखाली निर्माते उत्कर्ष जैन आणि महेंद्र पाटील यांनी ‘अष्टपदी’ या वेगळ्या विषायावर आधारलेल्या आगामी मराठी चित्रपटाची घोषणा केली आहे. ‘अष्टपदी’च्या दिग्दर्शनाची जबाबदारी उत्कर्ष जैन स्वत: सांभाळणार आहेत. जुहू येथील आजीवासन स्टुडिओमध्ये गणेशगीताच्या ध्वनीमुद्रणाने या चित्रपटाचा मुहूर्त आणि घोषणा करण्यात आली. गीतकार गणेश चेऊलकर यांनी लिहिलेलं ‘तू सुखकर्ता विघ्नहर्ता दे स्वरदान गणपती’ हे गाणं ध्वनीमुद्रित करण्यात आलं आहे. मृण्मयी फाटक आणि अभिजीत कोसंबी यांच्या आवाजातील या गाण्याला मिलिंद मोरे यांचं संगीत लाभलं आहे. गीत ध्वनीमुद्रण अवधूत वाडकर यांनी केलं आहे.

या चित्रपटाबाबत उत्कर्ष जैन म्हणाले की, चित्रपटाची कथा ‘अष्टपदी’चा खरा हिरो आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना एक संगीतमय त्रिकोणी प्रेमकथा पाहायला मिळणार आहे. प्रेमकथेला साजेशी श्रवणीय संगीताची किनार जोडण्याचं सुरेख काम मिलिंद मोरे यांनी केलं आहे. ‘अष्टपदी’च्या पटकथेत प्रेमाचे आजवर कधीही न उलगडलेले पैलू पाहायला मिळणार आहेत. या निमित्ताने कलाकारांची तगडी फळी प्रेक्षकांचं मनोरंजन करणार असून, दर्जेदार निर्मितीमूल्ये आणि नेत्रसुखद सादरीकरण प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेण्यात यशस्वी ठरेल अशी आशाही उत्कर्ष यांनी व्यक्त केली आहे.

पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी

# नैसर्गिक तलाव रस्त्यासाठी बुजविण्याच्या हालचाली

ठाणे (गणेश भोईटे) :

**कल्याण, डोंबिवली शहरांमधील जुने तलाव, विहिरी विकास कामे, नवीन गृहप्रकल्पांसाठी बुजविण्याचा सपाटा बांधकाम धारकांकडून सुरू आहे. आता डोंबिवली पश्चिमेतील कोपर भागात अनेक वर्षांचा नैसर्गिक झरे असलेला एका जुना तलाव बुजविण्याच्या जोरदार हालचाली रस्ते बांधकाम ठेकेदाराकडून सुरू आहेत. कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक झरे असलेला कोपर येथील जुना तलाव बुजवू नये म्हणून पर्यावरणप्रेमींनी शासनस्तरावर जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत.**



## तलावात नैसर्गिक झऱ्यांमुळे बारमही पाण

कोपर पश्चिमेत खाडी किनारा भागात एक जुना तलाव आहे. याठिकाणी नागरिक गणपती विसर्जनासाठी, मासेमारीसाठी येतात. या तलावात नैसर्गिक झऱ्यांमुळे बारमही पाणी असते.जैवविविधतेला हा तलाव पिण्याच्या पाण्यासाठी मोठा आधार आहे. या तलावाच्या चारही बाजुने खारफुटी, जंगली झाडे आहेत. या तलावाच्या बाजुने माणकोली पुलाकडून येणारा रेतीबंदर रेल्वे फाटकाकडे जाणारा एक रस्ता बांधला जात आहे. एमएमआरडीएने माणकोली पुलाच्या डोंबिवली बाजूकडील उतार रस्त्यावर कल्याण डोंबिवली पालिकेचा वळण रस्ता बाधित केला. त्यामुळे डोंबिवलीत येणाऱ्या वाहनांसाठी एमएम आरडीएला मोठागाव स्मशानभूमी, मल उदंचन केंद्र ते कोपर भागातून एक रस्ता रेतीबंदर रेल्वे फाटकाच्या दिशेने बांधावा लागत आहे. या रस्त्यासाठी कोपर भागातील नैसर्गिक तलाव बाधित होत आहे. त्यामुळे तो बाजुच्या भागात पाण्यासह स्थलांतरित करण्याचे प्रयत्न ठेकेदाराकडून सुरू आहेत. नवीन जागेत चारही बाजुने सिमेंट भिंत बांधून हा तलाव संरक्षित केला जाण्याचा देखावा ठेकेदाराकडून उभारला जात आहे, असे पर्यावरणप्रेमींना सांगितले. जुन्या तलावाखाली नैसर्गिक झरे आहेत. ते कसे स्थलांतरित करणार. एकदा जुन्या तलावाच्या जागी रस्ता बांधून झाला की ते झरे काँक्रीटखाली बुजले जाणार आहेत, अशी माहिती पर्यावरणप्रेमींनी दिली.

डोंबिवली खाडी भागातील खारफुटी जंगल भूमाफियांनी बेकायदा चाळींसाठी नष्ट करून या भागातील जैवविविधत नष्ट केली आहे.

कल्याण, डोंबिवली पालिका हद्दीतील शहराच्या मुख्य रस्ते, भागातील सावली देणारी झाडे रस्ता रूंदीकरण, काही गृहप्रकल्प उभारणाऱ्या विकासकांनी पालिकेच्या परवानग्या घेऊन तोडली. या झाडांच्या बदल्यात पालिकेने निश्चित केलेल्या आंबिवली परिसरातील जागेवर या विकासकांनी एका झाडाच्या बदल्यात १० झाडे लावून दिली आहेत. ४० वर्षापूर्वीच्या अनेक इमारती, घरांच्या परिसरात जुन्या विहिरी होत्या. या विहिरी विकासाच्या नावाखाली विकासकांनी बुजून टाकल्याचे चित्र कल्याण, डोंबिवलीत आहे. नैसर्गिक स्त्रोत बुजवून पर्यावरणाची हानी करण्याचे काम एक यंत्रणा करत असल्याची टीका पर्यावरणप्रेमी करत आहेत.

### देवीचापाडा चौकशी

देवीचापाडा जेट्टी जवळ तीन महिन्यापूर्वी मातीचे भराव टाकून माफियांनी खारफुटी नष्ट केली. या प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. याची चौकशी करण्यासाठी एक पथक डोंबिवलीत येत आहे. कल्याण, डोंबिवली शहरातील जैवविविधता, जुने पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत विकासकामे, गृहप्रकल्पांच्या नावाखाली बुजविले जात आहेत. यामध्ये पर्यावरणाची हानी होत आहे. अशा परिस्थितीत कोपरमधील जुना नैसर्गिक झरे असलेला तलाव स्थलांतरित किंवा बुजविण्यात येऊ नये यासाठी आम्ही शासनस्तरावर प्रयत्नशील आहोत.

# शुक्रवारी ठाण्यात पाणी नाही

## एमआयडीसीचा जल वाहिनी दुरुस्तीसाठी शटडाऊन

ठाणे (मेधा भोईटे) : ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा म नपाडा व वागळे (काही भागात) या प्रभाग समिती क्षेत्रामध्ये गुरुवार २३ मे रात्री १२ पासून शुक्रवार २४ मे रात्री १२ वाजेपर्यंत पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

■ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून येणारे पाणी या भागात दिले जाते. एमआयडीसीच्या पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी गुरुत्व वाहिनीच्या कटाई नाका ते शीळ टाकी येथे तातडीचे दुरुस्तीचे काम हाती घेतल्यामुळे त्यांच्याकडून होणारा पाणी पुरवठा दि. २३/०५/२०२४ रात्री १२.०० ते शुक्रवार दि. २४/०५/२०२४ रात्री १२.०० वा एकूण २४ तास बंद राहणार आहे.

■या शटडाऊन कालावधीत ठाणे महानगरपालिके अंतर्गत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्रमांक २६ व ३१ चा काही भाग वगळता) आणि कळवा प्रभाग समितीमधील सर्व भागामध्ये, वागळे प्रभाग समितीमधील रुपादेवी पाडा, किसननगर नं. २, नेहरुनगर तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणी पुरवठा २४ तासासाठी पूर्णपणे बंद राहील.

■ पाणी पुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होईल याची कृपया नागरीकांनी नोंद घ्यावी. या काळासाठी पुरेसा पाणी साठा करून ठेवावा तसेच पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे नागरीकांना आवाहन करण्यात आले आहे.


## जिवंत महिला मतदान केंद्रावर ठरली 'मयत'

पालघर : पालघर लोकसभा मतदार संघातील अनेक मतदारांची नावे याद्यांममधून गायब झाली असतानाच नायगाव पूर्वेच्या जूचंद्र येथे मतदान केंद्रावर गेलेल्या जिवंत महिलेला मयत ठरविले असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुशीला राजाराम पाटील असे वयोवृद्ध महिलेचे नाव आहे.

सोमवारी पालघर लोकसभा मतदार संघात मतदान प्रक्रिया पार पडली. मात्र मतदार याद्यामधील घोळ यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागले आहे.नायगाव पूर्वेच्या जूचंद्र मतदान केंद्रावर ही नावे यादीत नसल्याने अनेकांना मतदान करता आले नाही. तर दुसरीकडे जिवंत असलेल्या महिलेला मतदार यादीत मयत घोषित केल्याने मतदान केंद्रावर गेलेल्या महिलेला मतदान करता आले नाही.

सुशीला राजाराम पाटील (७२) ही महिला सोमवारी दुपारी बाराच्या सुमारास मतदान केंद्रावर आधारकार्ड व मतदान ओळखपत्र घेऊन मतदान केंद्रावर गेली होती. मात्र मतदान केंद्रात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांनी तू मयत असल्याने तुला मतदान करता येणार नाही असे या महिलेला सांगण्यात आले आहे.

मी जिवंत आहे असे असताना मला मयत घोषित कसे काय केले असा प्रश्न या महिलेने उपस्थित केला आहे. मतदानाचा हक्क प्रत्येक नागरिकाने बजावावा यासाठी निवडणूक आयोगाकडून जनजागृती केली जाते मात्र मतदान केंद्रावर गेल्यावर जर जिवंत व्यक्ती मयत दाखविली जात असेल तर कसे मतदान होईल असा प्रश्न या महिलेच्या कुटुंबीयांनी उपस्थित केला आहे. जिवंत असलेल्या महिलेला मतदान केंद्रावर मयत ठरविल्याने निवडणूक विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा दिसून आला आहे.



कोपरमध्ये उद्यानाच्या

# आरक्षित भूखंडावर बेकायदा इमारत

डोंबिवली डोंबिवली पश्चिमेतील कोपर भागात बेसुमार बेकायदा इमारतींची कामे सुरू आहेत. पालिकेचे आरक्षित भूखंड, मोकळ्या जागा हडप करून या बेकायदा इमारती भूमाफियांकडून उभारल्या जात आहेत.

कोपरमधील सखाराम नगर गृहसंकुलाच्या बाजुला उद्यानाच्या आरक्षणावर भूमाफियांनी एक सात माळ्याची बेकायदा इमारत उभारली आहे. या इमारतीला तात्काळ रंगरंगोटी करून या इमारतीवरून कल्याण डोंबिवली पालिकेच्या ह प्रभागाकडून कारवाई होऊ नये अशी व्यवस्था येथे करण्यात आली आहे. पालिकेच्या नगररचना विभागातील एका कर्मचाऱ्याला हाताशी धरून या जागेच्या आरक्षित भौगोलिक क्षेत्रात बदल करून या बेकायदा इमारतीची उभारणी केली असल्याची माहिती या भागातील स्थानिकांनी दिली आहे.

*■ सखारामनगर गृहसंकुल भागातील पालिकेचे आरक्षित भूखंड हडप करून भूमाफियांनी बेकायदा इमले उभे केले आहेत. यापूर्वी या भागातील काही बेकायदा इमारतींवर कारवाई झाल्या आहेत. डोंबिवलीत सर्वाधिक बेकायदा इमारती उभारणाऱ्या, महारेरा गुन्हे प्रकरणात आरोपी असलेल्या एका भूमाफियाचा या बेकायदा इमारत प्रकरणात सक्रिय सहभाग असल्याचे या भागातील तक्रारदारांनी सांगितले. या इमारतीची तक्रार करणाऱ्या डोंबिवली पूर्वेतील माध्यम क्षेत्रातील आणि एका लोकप्रतिनिधीला या बेकायदा माफियांनी दोन सदनिका निशुल्क दिल्या असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. या बेकायदा इमारतीची पालिकेत नावनिशी तक्रार केली तर कोपर भागात फिरणे मुश्किल होईल या भीतीने या बेकायदा इमारती विषयी उघडपणे बोलण्यास कोणीही तयार नाही.*


*■ पालिकेतील नगररचना विभागातील एका वादग्रस्त कर्मचाऱ्याने ही बेकायदा इमारत उभारणीसाठी महत्वाची भूमिका बजावली असल्याचे स्थानिकांनी सांगितले. या बेकायदा इमारतीमुळे परिसरातील सोसायट्यांमधील रहिवासी त्रस्त आहेत. याबेकायदा इमारती विषयी कोपर भागातील काही स्थानिकांनी पालिका आयुक्तांकडे तक्रारी केल्या आहेत. परिसरातील रहिवाशांच्या पाणी पुरवठा या बेकायदा इमारतीमधील रहिवाशांकडून वापरला जाणार असल्याने या भागातील लोकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे.*

*■ आता लोकसभा निवडणुकीचे मतदान संपले असल्याने आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी कोपर मधील या बेकायदा इमारतीसह कोपरमधील ९० फुटी रस्त्यावरील शिवसेना शाखेजवळील बेकायदा इमारत, जुनी डोंबिवलीतील प्रकाश गोठे, शंकर ठाकूर यांच्या फशी हाईट्ससह दोन इमारती, ठाकुरवाडीतील शिव लिला, राहुलनगरमधील सुदामा हाईट्स, रमाकांत आर्केड, कोपर रेल्वे स्थानकाजवळील कोंबड्यांचा खुराडा, कंभारखाणपाडा भागातील नव्याने उभ्या राहत असलेल्या बेकायदा इमारती जमीनदोस्त करण्याचे आदेश देण्याची मागणी तक्रारदारांकडून करण्यात येत आहे. नगररचना विभागातील अधिकाऱ्याने कोपर भागात सखारामनगर भागात एकही नवीन इमारतीला अलीकडे बांधकाम परवानगी दिलेली नाही, असे सांगितले.*

## दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्ताने मुख्यालयात शपथ

पनवेल : माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधींच्या स्मृतींना वंदन करून पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज मंगळवार दिनांक २१.५.२०२४ रोजी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्ताने शपथ घेण्यात आली. यावेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त मारुती गायकवाड, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, उप अभियंता सुधीर साळुंखे, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते





शिवाईनगर ठाणे सौ. पुष्पा नंदकुमार दत्तात्रेय देशमुख, अध्यक्ष उपनगरी रेल्वे प्रवासी महासंघ.

दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त

# नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात प्रतिज्ञा

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटरमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.शरद पवार यांच्यासमवेत उपस्थित समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, सहा. आरोग्य अधिकारी श्रीम. रत्नप्रभा चव्हाण, लेखाधिकारी मारोती राठोड, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण कटके तसेच इतर अधिकारी, कर्मचारी यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली. यावेळी माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पमालिका अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

''आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याव्दारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करीत आहोत'' अशी प्रतिज्ञा घेत महापालिका अधिकारी, कर्मचारीवृंदाने ''आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करू, तसेच मानवी जीवित आणि मूल्य धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तीचा प्रतिकार करू'' असा दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञेचा मजकूर सर्वांनी सामुहिकरित्या म्हटला.




## पनवेल तालुक्यातील ९७.८२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण



पनवेल: पनवेल तालुक्यातील १०,५५८ विद्यार्थ्यांपैकी १०,३२८ विद्यार्थी बारावीच्या परिक्षेत उत्तीर्ण झाले असून तालुक्यातील ९७.८२ टक्के निकाल लागल्याची माहिती तालुका गट शिक्षणाधिका-यांनी दिली. पनवेल तालुक्यातील ५९ महाविद्यालयांमधील १०,५५८ विद्यार्थ्यांनी बारावीची परिक्षा दिली होती. मंगळवारी दुपारी एक वाजता बारावी परीक्षेच्या ऑनलाईन निकालाकडे शेकडो विद्यार्थी व पालकांचे लक्ष्य लागले होते.

रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक महाविद्यालये आणि शाळा पनवेल तालुक्यात असल्याने येथे पालकवर्ग मोठ्या प्रमाणात आहे. तालुक्यातील आर.एस.एस. आर्टस, व्ही. के. हायस्कूल, सी. के.ठाकूर ज्युनिअर कॉलेज, महात्मा एज्युकेशन सोसायटी, एन.एन. पालिवाल ज्युनिअर कॉलेज, कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन सोसायटी महाविद्यालय या सहा महाविद्यालयांमध्ये पाचशेहून अधिक विद्यार्थ्यांनी बारावीची परिक्षा दिली होती.

ठाण्यात ठेकेदाराची मुजोरी

# मतदान यंत्र ठेवलेल्या परिसरात आदेशानंतरही खोदकाम करून विद्युत वाहिनी तोडली

ठाणे : लोकसभा मतदान पार पडत असल्याने महावितरण कंपनी आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्याचे खोदकाम करू नये असे आदेश दिले होते. असे असतानाही सोमवारी सायंकाळी एका ठेकेदाराने मुजोरी करत चक्क मतदान यंत्रणा ठेवलेल्या जागेत म्हणजेच, दक्षता सुरक्षा कक्ष (स्ट्रॉंग रुम) असलेल्या भागात रस्ते दुरुस्तीसाठी खोदकाम केले. त्यामुळे या भागातील विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. सुदैवाने स्ट्रॉंग रुमच्या विद्युत वाहिनी तुटली नाही. अन्यथा येथील यंत्रणा ठप्प झाली असती. हे प्रकरण गांभीर्याने घेऊन महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात खोदकाम करणारी कंपनी लँडमार्क कॉर्पोरेशन विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कासारवडवली येथील एका शाळेमध्ये स्ट्रॉंग रुम स्थापन करण्यात आले आहे. या स्ट्रॉंग रुममध्ये मतदान यंत्र ठेवले जाते. सीसीटीव्ही कॅमेरे तसेच मोठ्याप्रमाणात यंत्रणा येथे स्थापन करण्यात आली आहे. पोलिसांही येथे कडेकोट बंदोबस्त असतो. येथील विद्युत पुरवठा खंडीत केला जाऊ नये यासाठी महावितरण कंपनीने ठाणे महापालिका, एमएमआरडीए यासह सर्वच यंत्रणांना घोडबंदर मार्गावरील पातलीपाडा ते कावेसर पर्यंत खोदकाम करू नये अशी सूचना केली होती. घोडबंदर भागात मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा. लि. या कंपनीला ठाणे महापालिकेने रस्ता रुंदीकरणाचा ठेका दिला आहे. या कंपनीलाही खोदकाम करू नये असे आदेश महापालिकेने दिले होते. असे असतानाही कंपनीने स्टॉंग रुम पासून अवघ्या ३०० मीटर अंतरावर खोदकाम करून विद्युत वाहिनी तोडली. सुदैवाने स्ट्रॉंग रुमच्या विद्युत वाहिनीला धक्का लागला नसल्याने येथील विद्युत पुरवठा सुरळीत होता. परंतु एक विद्युत वाहिनी तुटल्याने येथील परिसरातील इतर भागाचा विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. त्यामुळे महापालिकेच्या पाणी पुरवठ्यावरही परिणाम झाला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महावितरणने मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा. लि.विरोधात कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या ठेकेदाराने यापूर्वी अशाचप्रकारे अनेकदा खोदकाम करून विद्युत वाहिन्या तोडल्या आहेत अशी माहिती महावितरणच्या एका अधिकाऱ्याने दिली.



ठाणे महानगरपालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर, उपायुक्त बिरारी यांनी उपस्थितांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त, देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा शक्तीनिशी मुकाबला करण्याची शपथ दिली. यावेळी, महापालिकेचे विधी सल्लागार मकरंद काळे, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१